नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २२२ Issue - 222 | वार रविवार दि. २९ डिसेंबर २०२४ Blow- Sunday Date 29 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## डॉ. मनमोहन सिंग पंचत्वात विलीन



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

### शासकीय इतमामात अंत्यसंस्कार; ज्येष्ठ कन्येकडून मुखाग्नी

नवी दिल्ली : देशाच्या आर्थिक सुधारणांचे जनक आणि माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शनिवारी निगमबोध घाट येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. सिंग यांची ज्येष्ठ कन्या उपिंदर सिंग यांनी मुखाग्नी दिला. या प्रसंगी राजकीय मतभेद बाजूला ठेवून विविध राजकीय पक्षांचे नेते अंत्यविधीसाठी उपस्थित राहिले. डॉ. सिंग यांचे गुरुवारी ९२ व्या वर्षी निधन झाले. डॉ. मनमोहन सिंग यांची पत्नी गुरशरण सिंग, तीनही मुली उपिंदर सिंग, दमन सिंग व अमृत सिंग यांच्यासह सिंग यांच्या कुटुंबातील अन्य सदस्यांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. लष्कराच्या तोफगाडीतून डॉ. सिंग यांचे पार्थिव निगमबोध घाट स्मशानभूमीत आणले गेले. तिन्ही सैन्यदलांनी २१ तोफांची सलामी दिली. त्यानंतर धार्मिक विधींसह शासकीय इतमामात डॉ. सिंग यांच्यावर अंत्यविधी (पान २ वर...)

## फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

### देशमुख हत्याकांड प्रकरण; बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चा, हजारो नागरिक रस्त्यावर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बीड: सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे देण्यात आलेला आहे. त्यानंतर आता या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसदेखील ॲक्शन मोडवर आले आहेत. देशमुख हत्याकांडातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले आहेत. बीडमधील शस्त्र परवान्यांबद्दलही त्यांनी महत्त्वाचे आदेश दिले आहेत.

बीडमध्ये आज सर्वपक्षीय आक्रोश मोर्चा काढण्यात आलेला होता. त्यात भाजपचे आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी काँग्रेस शपचे आमदार जितेंद्र आव्हाड, संदीप क्षीरसागर, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, खासदार बजरंग सोनावणे, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील उपस्थित होते. देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्याची मागणी सगळ्याच उपस्थितांनी केली. मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे या सगळ्या नेत्यांच्या रडारवर होते.

धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड या प्रकरणात आरोपी आहे. पण तो अद्याप फरार आहे. १९ दिवस झाले तरीही त्याला अटक झालेली नाही. दुसरीकडे कराडशी संबंधित अनेकांचे व्हिडीओ, फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. कराडच्या जवळच्या अनेकांच्या हातात बंदुका, पिस्तुलं दिसत आहेत. काहीजण



गोळीबार करताना दिसत आहेत. या सगळ्यांची दखल फडणवीस यांनी घेतली आहे.

फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले आहेत. जप्तीची प्रक्रिया तातडीनं सुरु करण्याच्या सूचना सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बुरडेंना देण्यात आल्या आहेत. बंदुकीसोबत ज्यांचे फोटो, व्हिडीओ व्हायरल झाले आहेत, त्यांच्या परवान्यांचा फेरआढावा घेऊन परवाने रद्द करण्याचे आदेश फडणवीस यांनी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांना दिले आहेत.


सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अद्याप अटक झालेली नाही. खंडणी प्रकरणातून देशमुख यांची हत्या झाली. खंडणी प्रकरणी वाल्मिक कराडचं नाव आलेलं आहे. पण त्याला अटक झालेली नाही. कराड हा धनंजय मुंडेंचा अतिशय जवळचा मानला जातो. त्यामुळेच त्याला वाचवलं जात असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे कराडला पोलीस संरक्षण होतं. त्यातून तो फरार झाल्यानं आश्चर्य व्यक्त होत आहे.

## मनमोहन सिंग यांच्या अंत्यसंस्कारानंतर राहुल गांधींनी सरकारला घेरले

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : माजी पंतप्रधान मनमोहन सिंग शनिवारी पंचतत्वात विलीन झाले आहेत. जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी देशभरात लौकिक मिळवला होता. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे शासकीय इतमामात सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मुलीने त्यांना मुखाग्नी दिला. परंतु काँग्रेसचे रायबरेलीचे खासदार राहुल गांधी यांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निगमबोध घाटावर अंत्यसंस्कारावर करण्यावरुन केंद्र सरकारला घेरले आहे.

राहुल गांधी यांनी एक्स हँडलवरील पोस्टमध्ये लिहिले आहे की, 'सध्याच्या सरकारने भारत मातेचे महान सुपुत्र आणि शीख समुदायाचे पहिले पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे अंत्यसंस्कार आज निगमबोध घाटावर करून त्यांचा अपमान केला आहे. ते एक दशक भारताचे पंतप्रधान होते, त्यांच्या काळात देश आर्थिक महासत्ता बनला आणि त्यांची धोरणे आजही देशातील गरीब आणि मागासवर्गीयांना आधार देत आहेत.'



राहुल गांधींनी केंद्र सरकारला घेरत पुढे लिहिले की, 'आजपर्यंत सर्व माजी पंतप्रधानांच्या प्रतिष्ठेचा आदर करून, अधिकृत समाधीस्थळावर त्यांचे अंतिम संस्कार करण्यात आले आहेत. जेणेकरून प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही गैरसोयीशिवाय त्यांना श्रद्धांजली वाहता येईल. डॉ. मनमोहन सिंग हे आमच्या सर्वोच्च आदराचे आणि समाधीस्थळासाठी पात्र आहेत. देशाच्या या महान सुपुत्राबद्दल आणि त्यांच्या गौरवशाली समाजाबद्दल सरकारने आदर दाखवायला हवा होता.'

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर शनिवारी दिल्लीतील निगमबोध घाटावर शीख प्रथेनुसार अंत्यसंस्कार पार पडले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस पक्षाचे इतर ज्येष्ठ नेते आणि सरकारचे मंत्री आदी अंत्यसंस्काराच्या वेळी उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत मनमोहन सिंग यांना लष्करी बँडसह तिन्ही सशस्त्र दलांच्या अधिकाऱ्यांनी अखेरची मानवंदना वाहिली.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे अंत्यसंस्कार अशा महत्वपूर्ण ठिकाणी व्हावेत, जिथे त्यांचे स्मारकही बांधले जावे, अशी पत्राच्या माध्यमातून विनंती केली होती. मनमोहन सिंग यांचे अंत्यसंस्कार आणि स्मारकासाठी जागा न मिळणे हा भारताच्या पहिल्या शीख पंतप्रधानांचा जाणीवपूर्वक केलेला अपमान असल्याचा आरोप पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला होता. तर दुसरीकडे, केंद्रीय गृहमंत्रालयानेही सांगितले की, मनमोहन सिंग यांच्या स्मारकासाठी सरकार जागा देणार आहे.

## काश्मिरात हिमवृष्टीने जनजीवन विस्कळीत;विमान रेल्वेसेवा ठप्प, जम्मूश्रीनगर महामार्ग बंद

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

श्रीनगर : काश्मीर खोऱ्यातील अधिकांश भागात हिमवृष्टी झाल्याने शनिवारी जनजीवन विस्कळीत झाले. अधिकांश भागात हिमवृष्टीमुळे विमान आणि रेल्वेसेवाही ठप्प झाली होती तर जम्मू-श्रीनगर महामार्गही बंद झाला. शुक्रवारी खोऱ्यात मोसमातील पहिली हिमवृष्टी झाली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीनगर व प्रसिद्ध पर्यटनस्थळ सोनमर्गमध्ये प्रत्येकी आठ इंच तर गांदरबलमध्ये सात, श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावरील जोजीला येथे १५ तर अनंतनाग जिल्ह्यातील मैदानी भागात १७ इंच हिमवृष्टी झाल्याची नोंद झाली.

हिमवृष्टीमुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला तर रेल्वे रुळांवर मोठ्या प्रमाणात बर्फ साचल्यामुळे बनिहाल - बारामुला मार्गावर रेल्वे वाहतूकही ठप्प झाली होती. हिमवृष्टीमुळे श्रीनगर विमानतळावरील धावपट्टीवर बर्फ साचल्यामुळे सर्व उड्डाणे रद्द करण्यात



आली. यासोबतच खोऱ्यातील अनेक भागांमध्ये वीजपुरवठाही खंडित झाला होता. राज्यातील स्थितीचा मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनीही आढावा घेतला. दरम्यान काश्मीर विद्यापीठानेही सर्व परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. उत्तराखंडमध्ये मैदानी भागासह शिखरांवरही हिमवृष्टी आणि पावसामुळे राज्यातील थंडीत वाढ झाली आहे. यासोबतच हिमालयीन मंदिरांकडे जाणारे महामार्गही अनेक ठिकाणी बंद राहिले. औली, हर्षिल, हेमकुंड साहिब, चोपता, दयारा, लोखंडी, सुक्की टॉप, मुनस्यारी आणि पिथौरागढवर बर्फाची चादर पसरल्याचे दृश्य आहे. श्रीनगर-सोनमर्ग राष्ट्रीय महामार्गावरील गुंड येथील स्थानिक नागरिकांनी हिमवृष्टीत अडकलेल्या पर्यटकांना मशिदीत आश्रय दिला. पंजाबच्या पर्यटकांचे वाहन हिमवृष्टीमुळे अडकून पडले होते. त्या वेळी जवळपास एकही हॉटेल अथवा राहण्याची व्यवस्थाही नव्हती. याची माहिती मिळताच स्थानिकांनी जामिया मशिदीचे दार पर्यटकांसाठी उघडले. त्यामुळे पर्यटकांना रात्रभर येथे आश्रय घेता आला. नागरिकांनी केलेल्या आदरातिथ्यामुळे सर्व पर्यटक भारावले होते. दरम्यान, 'हा सर्वोत्तम उपाय होता कारण मशिदीत 'हमाम' (स्नानगृह) आहे, जो रात्रभर गरम राहतो' असे पर्यटक बशीरने सांगितले.

## प्रकाश आंबेडकरांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट, दोघांमध्ये तासभर चर्चा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर बंगल्यावर जाऊन भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. प्रकाश आंबेडकर यांनी परभणीमधील हिंसाचार प्रकरण आणि पोलीस कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्याशी संबंधित प्रकरणावर चर्चा मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. तसेच आंबेडकरांनी फडणवीसांपुढे वेगवेगळ्या मागण्या मांडल्या. यापैकी काही मागण्या मुख्यमंत्री फडणवीसांनी मान्य केल्याची माहिती स्वतः आंबेडकर यांनी दिली आहे. आंबेडकर यांनी एक्सवर यासंबंधीची एक पोस्ट केली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की आज सकाळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. परभणीच्या प्रकरणासंदर्भात बराच वेळ चर्चा झाली. पीडित सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना देण्यात येणारी मदत ही किरकोळ असून, त्यांना एक कोटींची भरपाई देण्यात यावी आणि त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्यात यावी. परभणी प्रकरणात चौकशी करून ज्यांनी निरपराध नागरिकांना क्रूरपणे मारहाण केली आहे. अशा पोलिसांच्या विरोधात गुन्हा नोंदवला गेला पाहिजे, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली. ती मागणी त्यांनी मान्य केली आहे. आंबेडकरी वस्त्यांमध्ये जाऊन काही नागरिकांच्या घरांची मोडतोड करण्यात आलेली आहे. अशा नागरिकांना शासनाने नुकसानभरपाई देण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्य केले आहे. त्याचप्रमाणे आदिवासी



विद्यार्थ्यांच्या डीबीटीसंदर्भात सुद्धा मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात आली असून, त्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे सांगितले आहे.

यासह आंबेडकर यांनी इतरही मागण्या केल्या आहेत. प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर आणखी एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की परभणीत पोलिसांनी क्रूरतेने केलेल्या मारहाणीत बळी पडलेल्यांची यादी करण्यासाठी आणि पुरेशी भरपाई देण्यासाठी सर्वेक्षण करा. १ जानेवारी रोजी होणाऱ्या भीमा कोरेगावच्या अभिवादन सोहळ्यापूर्वी फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा हिंसाचार आणि चुकीची माहिती पसरवण्याच्या कोणत्याही प्रयत्नांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि ते हाणून पाडण्यासाठी पोलिसांना निर्देश द्यावेत. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना रद्द करा आणि पूर्वीची प्रणाली पुन्हा सुरू करावी. परभणीत पोलिसांनी क्रूरपणे केलेल्या मारहाणीत बळी पडलेल्यांची यादी करून त्यांना पुरेशी भरपाई देण्याची आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी डीबीटी रद्द करण्यासाठी सल्लामसलत करण्यासाठी, सर्वेक्षण करण्याची आमची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केली आहे.

### छत्रपती संभाजीराजेंनी कडक शब्दांत ठणकावलं

### संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट

## धनंजय मुंडेंना बीडचं पालकमंत्री केलं तर मी स्वत: बीड जिल्ह्याचं पालकत्व घेणार

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बीड : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून निर्घृण हत्या केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेला आज २० दिवस झाले आहेत. या प्रकरणातील काही आरोपींना पोलिसांनी अटक केली. मात्र, या घटनेतील काही आरोपी अद्यापही फरार आहेत. त्यामुळे फरार आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी आणि संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ आज बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात विविध पक्षाचे नेते, आमदार आणि कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. या मोर्चात माजी खासदार



छत्रपती संभाजीराजे हे देखील सहभागी झाले होते. यावेळी मोर्चाला संबोधित करताना छत्रपती संभाजीराजे यांनी धनंजय मुंडे यांच्यासह राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच 'धनंजय मुंडेंना बीडचं पालकमंत्री केलं तर मी स्वत: बीड जिल्ह्याचं पालकत्व घेईल', असं म्हणत छत्रपती संभाजीराजे यांनी कडक शब्दांत ठणकावलं आहे.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची एवढ्या निर्घृण पद्धतीने हत्या केली गेली. मग एवढी दहशत आहे हे दुर्दैव आहे. मी जेव्हा संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना भेटलो तेव्हा मला तेथील अनेक लोकांनी माहिती सांगितली. त्यांची मतं माझ्याबरोबर व्यक्त केली. मी याआधीही सर्वासमोर सांगितलं होतं की, या घटनेतील जो म्होरक्या आहे, त्या म्होरक्याला आश्रय देणाऱ्या धनंजय मुंडेंना मंत्रिपद देऊ नका. पण तरीही त्यांना मंत्रिपद दिलं गेलं. आता त्यांचा (धनंजय मुंडे) राजीनामा घेतील की नाही मला माहिती नाही. पण बीड जिल्ह्यातील सर्व जनतेला मला हे सांगायचं की जर त्यांना (धनंजय मुंडेंना) बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद दिलं तर मी स्वत: बीड जिल्ह्याचं पालकत्व घेणार, अशा शब्दांत छत्रपती संभाजीराजे यांनी ठणकावलं आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा हा महाराष्ट्र आहे आणि जर या महाराष्ट्रात कोणी दहशत परवण्याचं काम करत असेल तर माझं कर्तव्य आहे की मी या ठिकाणी येणं. हे काय चाललंय? बीडचा बिहार करायचा आहे का? हा महाराष्ट्र आहे. या घटनेला २० दिवस झालेत पण तीन आरोपी अद्याप सापडत नाहीत आणि त्या आरोपींचा म्होरक्याही सापडत नाही. हे कसं चालतं? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विधानसभेत बोलतात की हा म्होरक्या खंडणीच्या गुन्ह्यात दोषी आहे. मग अद्याप त्याच्यावर कारवाई का नाही? मात्र, यापुढे आम्ही ही दहशत खपवून घेणार नाहीत. अजित पवार म्हणतात की माझी काम करण्याची पद्धत परखड आहे. मग जर तुमची काम करण्याची पद्धत परखड असेल तर आता तुम्ही करेक्ट कार्यक्रम करा. त्या मंत्र्याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, असं छत्रपती संभाजीराजे यांनी म्हटलं आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

रविवार दि. २९ डिसेंबर २०२४




# क्रीडा महोत्सवाचा काळ

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विभाग व विविध पदवी अभ्यासक्रम असो, दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यासाठी शालेय क्रीडा समिती स्थ-ापन करण्यात येते. त्याला अनुसरून शाळेतील मुलांची पटसंख्या लक्षात घेऊन गट तयार केले जातात. त्यानंतर त्या गटांना नावे व त्या गटांचा गट प्रमुख निवडला जातो. गटांच्या गट प्रमुखांची निवड झाल्यानंतर प्रत्येक गटाचे गट प्रमुख इतर विद्यार्थ्यांची आपल्या गटात निवड करतात. काही वेळा विद्यार्थ्यांच्या नावाच्या चिठ्या तयार करून एका बॉक्समध्ये ठेवल्या जातात. त्यानंतर गट प्रमुख एक चिठ्ठी उचलतो. त्या चिठ्ठीत ज्याचे नाव असेल तो त्या गटात. काही वेळा एकमेकांच्या सहमताने गटात विद्यार्थी घेतले जातात. काही ठिकाणी दह-ावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा लक्षात घेऊन शालेय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना इजा होऊ नये म्हणून सहभागी करून घेत नाहीत. मात्र असे न करता सर्व विद्यार्थ्यांना अशा खेळात सहभागी करून घेत-ले पाहिजे. मागील वर्षी छत्रपती संभाजीनगर येथील तनिषा बोराम णीकर हिने बुद्धिबळ खेळात राष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामगिरीमुळे इयत्ता १२ वीमध्ये (वाणिज्य विभाग) १०० टक्के गुण मिळवले. तिला ६०० गुणांपैकी ५८२ गुण मिळाले होते. मात्र तिला १८ क्रीडा गुण दिल्याने तनिषा हिला बारावीमध्ये १०० टक्के गुण मिळाले. तेव्हा विद्यार्थ्यांनी खेळाकडे दुर्लक्ष करू नये. मला पण बी. एड. प्रवेशाच्या वेळी क्रीडा गुणामुळे ३ टक्के गुण वाढले होते.

शालेय किंवा महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवामध्ये सांघिक व मैदानी खेळ असतात. सांघिक खेळामध्ये कबड्डी, खो-खो, क्रिकेट, हॉलीबॉल, बास्केटबॉल, हॉकी, लंगडी तर मैदानी खेळात १००, २०० व ४०० मी धावणे, उंच उडी, लांब उडी, भाला फेक, थाळी फेक, गोळा फेक इत्यादींचा समावेश असतो. हा क्रीडा महोत्सव तीन ते पाच दिवस चालतो. विशेष म्हणजे या खेळांसाठी पंच म्हणून माजी विद्यार्थी किंवा आपल्या परिसरात बीपीएड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना निमंत्रित केले जाते. यात ज्या गटाला अधिक गुण मिळतात त्या गटाला वार्षिक बक्षीस वितरण समारंभामध्ये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव केला जातो, तर वैयक्तिक खेळामध्ये ज्या खेळाडूचे अधिक गुण होतात त्याला त्या वर्षाचा 'चॅम्पियन' म्हणून त्याचा खास सन्मान करण्यात येतो. त्याचप्रमाणे शाळेच्या स्मरणिकेत त्याचा फोटो सुद्धा छापला जातो. यामुळे नवीन विद्यार्थ्यांना एक प्रेरणा मिळते. तसेच ज्या विद्यार्थ्याचा फोटो छापून आल्यावर त्यांचा एक प्रकारे उत्साह वाढत असतो. आपण तालुका अथवा जिल्हा स्तरावर खेळात भाग घेऊ शकलो नाही. मात्र शालेय स्तरा-वर आपण चांगली कामगिरी केली याचे सुद्धा त्यांना समाधान वाटते. अशा खेळातून प्रोत्साहन मिळाल्याम ुळे अभ्यासाकडे अधिक लक्ष देऊन चांगले गुण संपादन करतात. शालेय खेळामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाला व अभ्यासाला चांगली गती मिळते. तेव्हा विद्यार्थ्यांच्या जीवनात खे-ळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महत्त्वाची बाब म्हणजे सध्या काही शाळांना मैदान नसल्यामुळे काही ठरावीक विद्यार्थ्यांना गाडीने घेऊन भाड्याने घेतलेल्या मैदानावर स्पर्धा आयोजित करतात. त्यामुळे इच्छा असून सुद्धा सरावाचे कारण पुढे करून अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थी सहभागी होणे टाळतात.

सध्याच्या परिस्थितीत विशेषतः शहरात बंदिस्त शिक्षण चालते. शाळेत एकदा मुले गेली की बाहेरून गेटला कुलूप लावून घेतले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोकळेपणा वाटत नाही. याचा परिणाम आवड असून सुद्धा मुले अशा महोत्सवात भाग घेत नाहीत. यासाठी शाळेची स्थापना करीत असताना त्या शाळेचे स्वत:चे मैदान असले पाहिजे. अन्यथा शासन मान्यता देण्यात येऊ नये. आज अनेक नवीन शाळांना स्वतंत्र मैदान नसल्यामुळे खेळाची आवड असून सुद्धा खेळामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होता येत नाही. शेवटी सराव महत्त्वाचा असतो. जर नियमित खेळाचा सराव नसेल तर एक दिवस खेळल्यावर दुसऱ्या दिवशी काय होते याची कल्पना विद्यार्थ्यांना असते. त्यामुळे खेळामध्ये असे अनेक विद्यार्थी सहभागी होत नाहीत. तेव्हा विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर त्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळण्यासाठी प्रत्येक शाळेच्या मालकीचे मैदान असावे. जर शाळेचे मैदान असेल तरच उत्कृष्ट व शिस्तबद्ध खेळाडू निर्माण होऊ शकतात. याचा परिणाम आपला देश ऑलिम्पिक पदकांमध्ये आपण मागे आहोत. तेव्हा डिसेंबर महिना हा क्रीडा महोत्सवाचा काळ असला तरी त्यातील विविध खेळांत विशेष प्रावीण्य विद्यार्थ्यांनी मिळविले असेल तर त्याच्या क्रीडा गुणांना वाव मिळण्यासाठी शाळा व्यवस्थापकांनी पुढाकार घ्यावा. त्याचबरोबर त्या विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होणार नाही याकडे अधिक लक्ष द्यावे. तसेच क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळवून द्यावा. यासाठी ८ ते १४ वयोगटातील मुलांची निवड करतात.

राज्यातील क्रीडा प्रबोधिनीचे प्रम ुख उद्दिष्ट आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करणे होय. राज्यात महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रीडा प्रबोधिनीची स्थापना ३१ जानेवारी १९९६ रोजी करण्यात आली असून राज्यात ११ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे मुलांच्या पालकांनी चौकशी करून क्रीडा प्रबोधिनीचा लाभ घ्यावा. असे असले तरी विद्यार्थ्यांना शालेय स्तरा-वरील क्रीडा महोत्सवामध्ये आपले क्रीडा कौशल्य दाखवावे लागेल.

रवींद्र तांबे

# डॉ. मनमोहन सिंग पंचत्वात विलीन

(पान १ वरून..)

करण्यात आले. डॉ. सिंग यांच्या अंत्यसंस्कारासाठी निगमबोध घाटावर उपस्थित असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सिंग यांच्या कुटुंबाने भेट घेतली.

डॉ. सिंग यांना आदरांजली वाहण्यासाठी निगमबोध घाटावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह मोदी सरकारमधील इतर मंत्रीही उप-स्थित होते. काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, खासदार प्रियंका गांधी-वाड्रा यांच्यासह काँग्रेसच्या कार्यकारिणी समि तीचे सदस्य, संसदेच्या दोन्ही सभागृहांतील खासदार, प्रवक्ते व तमाम नेत्यांनी डॉ. सिंग यांना अखेरचा निरोप दिला.

डॉ. सिंग यांच्या निधनानंतर शुक्रवारी त्यांच्या निवासस्थ-ानी जाऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी सिंग यांना श्रद्धांजली दिली. केंद्रीय मंत्रिमंडळाने डॉ. सिंग यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव संमत केला. केंद्र सरकारने ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. डॉ. सिंग २००४ ते २०१४ अशी दहा वर्षे पंतप्रधान होते. सलग दोन वेळा पंतप्रधान झालेले व सर्वाधिक काळ या पदावर राहिलेले नेहरूंनंतरचे ते दुसरे काँग्रेस नेते होते. पंतप्रधानपदावरून पायउतार झाल्यानंतरही ते राज्यसभेचे सदस्य राहिले. एप्रिल २०२४ म ध्ये ते वरिष्ठ सभागृहातून निवृत्त झाले.

डॉ. सिंग यांच्यावर अंत्यसंस्कार करण्याआधी त्यांची ओळख असलेली व आवडीची निळी पगडी त्यांना घालण्यात आली. डॉ. सिंग फक्त निळ्या रंगाची पगडी घालत असत. केंब्रिज विद्यापीठातील त्यांच्या आठवणींचा भाग म्हणून डॉ. सिंग निळी पगडी घालत.

डॉ. सिंग यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेण्यासाठी अन्य पक्षांतील नेतेही आवर्जून काँग्रेसच्या मुख्यालयात आले होते. तृणमूल काँग्रेसचे लोकसभेतील गटनेते सुदीप बंदोपाध्याय तेसच, 'आरएसपी'चे एन. के. प्रेमचंद्रन यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली.

डॉ. सिंग यांचे पार्थिव म ोतिलाल नेहरू मार्गावरील निव-ासस्थानातून अकबर रोडवरील काँग्रेसच्या मुख्यालयात सकाळी सव्वानऊच्या सुमारास आणले गेले. तिथे मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये मंत्री राहिलेले पी. चिदम्बरम, सलमान खुर्शीद, सुशीलकुमार शिंदे, मनीष तिवारी आदी ज्येष्ठ नेत्यांनी आदरांजली वाहिली. काँग्रेसच्या मुख्यालयाबाहेर मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. मनमोहन सिंग यांना 'भार-तरत्न' देण्याच्या मागणीसाठी हे कार्यकर्ते घोषणाबाजी करत होते. काँग्रेस मुख्यालयात जय्यत तयारी करण्यात आली होती. दोन्ही बाजूला मोठे फलक, काँग्रेसचे ध्वज लावण्यात आले होते. मोठ्या संख्येने होणारी कार्यकर्त्यांची गर्दी लक्षात घेऊन मुख्यालयाबाहेर सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली होती.

# अभिमानास्पद! भारतीय लष्कराने चीनच्या सीमेलगत उभारला छत्रपती शिवरायांचा पुतळा; १४,३०० फुट उंचीवर फडकला भगवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लडाख : छत्रपती शिव-ाजी महाराज हे लाखो लोकांचे प्रेरणास्थान आहेत. देशभरात त्यांना मानणार तसेच त्यांचा आदर्श घेणारा मोठा वर्ग आहे. यादरम्यान भारतीय लष्कराने पूर्व लडाखमध्ये भारत चीन सीमेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला असून नुकतेच या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. हा पुतळा चीनबरोबरच्या सीम ेवरील वास्तविक नियंत्रण रेषेच्या (डउ) जवळ पँगॉन्ग तलावाच्या किनार्यावर १४,३०० फुट उंचीवर उभारण्यात आला आहे. लष्कराच्या लेह येथील १४ कॉर्प्सने यासंबंधी



माहिती दिली आहे. १४ कॉर्प्स (फायर अँड फ्यूरी कॉर्प्स)चे जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टनंट जनरल हितेश भल्ला यांनी या पुतळ्याचे गुरूवारी (२६ डिसेंबर) रोजी अनावरण केले.

पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रम ाचा व्हिडीओ देखील शेअर करण्यात आला आहे. २६ डिसेंबर २०२४ रोजी, १४,३०० फूट उंचीवर पँगॉन्ग त्सो (झरपसेपस ढी) च्या काठावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. शौर्य, दूरदृष्टी आणि दृढ न्यायाचे प्रतीक असलेल्या या पुतळ्याचे उद्घाटन हे लेफ्टनंट जनरल हितेश भल्ला, एससी, एसएम, व्हीएसएम, जीओसी फायर अँड फ्युरी कॉर्प्स आणि द मराठा लाइट इन्फंट्री यांच्या हस्ते करण्यात आले. अशी माहिती फायर अँड फ्युरी कॉर्प्सकडून देण्यात आली आहे.

एएनआय वृत्तसंस्थेने पुतळ्याच्या अनावरण करतेवेळीचा व्हिडीओ देखील शेअर केला आहे. ज्यामध्ये शिवरायांच्या पुतळ्यावरील कापड उचलले जाताना दिसत आहेत. याबरोबरच पुतळ्याशेजारी भगवा ध्वज देखील फडकताना पाहायला मिळत आहे.भारत आणि चीनने डेमचोक आणि डेपसांग भागातून सैन्य मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याच्या काही दिवसांनंतर लगेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. २१ ऑक्टोबर रोजी झालेल्या करारानंतर, भारत आणि चीन या देशांनी सैन्य मागे घेण्याचे काम पूर्ण केले आहे. पूर्व लडाखमध्ये ५ मे २०२० रोजी पँगॉन्ग लेक परिसरात हिंसक संघर्ष झाला होता, यानंतर दोन्ही देशांमध्ये दीर्घकाळ चाललेल्या लष्करी आणि राजकीय चर्चांनंतर वाद असलेल्या भागातून दोन्ही बाजूंनी सैन्य मागे घेण्याचा निर्णय घेतला.

# वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसविण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार राज्य शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसविण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील वाहनधारकांनी हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसव-ावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यासाठी एजंसी निश्चित करण्यात आली असून, एचएसआरपी नंबर प्लेटसाठी बुकींग करण्यासाठी http://maha-rashtrahsrp.com हे पोर्टल निश्चित करण्यात आले आहे. वाहनधारकांनी पोर्टलवर बुकींग करून त्यांच्या सोईप्रमाणे अपॉइंटमेंट घेऊन एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घेण्यात यावी. वाहनधारक सोल-ापूर कार्यालयातील नोंदणीधारक नसला तरी सोलापूरमध्ये वाहन वापरत असल्यास वाहनास एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे.

एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी दुचाकी, ट्रॅक्टरसाठी ४५० रूपये, तीनचाकीसाठी ५०० रूपये, इतर सर्व वाहनांसाठी ७४५ रूपयांप्रमाणे जीएसटी वगळून शुल्क आकारण्यात येणार आहे. वाहनधारकांना त्यांच्या वाहनावर एचए-सआरपी नंबर प्लेट बसविण्याबाबत तक्रारी असल्यास संबंधित सेवापुरवठा धारकांच्या पोर्टल, तसेच सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात तक्रार दाखल करू शकतील.

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे, तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे आवश्यक आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील वाहनधारकांनी वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्या वाहनावर एचएसआरपी नंबर प्लेट बसविली नसल्यास वाहनाचे मालकी हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त बोजा चढविणे, उतरविणे, दुय्यम प्रत, विमा अद्यावत करणे आदी कामकाज थांबविण्यात येणार आहे. एचएसआरपी नंबर प्लेट नसलेली वाहने, बनावट एचएसआरपी नंबर प्लेट असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी कळविले आहे.

# बोरामणी नाकाजवळ बल्करची दुचाकीला धडक ; एकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) बोरामणी नाकाजवळ बल्करने दुचाकीला धडक दिल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २७ डिसेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी राहुल सिद्ध-ाराम गामाजी (वय-२९,रा. मुक्काम पोस्ट आरळी तालुका अक्कलकोट यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून परमेश्वर प्रल्हाद दाईगडे (वय-४५,रा.दाईगंडेवाडी ता. मोहोळ) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे त्यांची दुचाकी क्रम ांक एमएच.१३.ईएम.६३९३ यावर पत्नी व मुलाला घेऊन सिग्नल सुटल्यानंतर पुढे जात असताना वरील संशयित आरोपी याने त्याच्या ताब्यातील सिमेंट बल्कर क्र.एमएच.१३.व्ही.टी.९९३६ या गाडीवर मदतनीस न ठेवता सिग्नल सुटल्यानंतर इंडिकेटर न लावता फिर्यादी यांच्या दुचाकीला मागून धडक दिली व त्यानंतर फिर्यादी यांची पत्नी,मुलगा गणेश याला गंभीर मुक्कामार लागून फॅक्चर करण्यास कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार राठोड हे करीत आहेत.

# युवा सेनेकडून मतिमंद विद्यार्थ्यांना मायेचा घास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सामाजिक विचारांचा वारसा जोपासत विविध उपक्रमांच्या माध्यमातून राज्याच्या सामाजिकिकरणाला आकार देणाऱ्या युवा सेनेचे प्रमुख पूर्वेश सरनाईक यांचा वाढदिवस पंढरपूर तालुका युवा सेनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

**युवा सेना प्रमुख पूर्वेश सरनाईक यांच्या वाढदिवसानिमित्त युवा सेनेचा उपक्रम**

याप्रसंगी पंढरपूर तालुक्यातील बाभुळगाव येथील नागनाथ मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना युवा सेनेचे तालुकाप्रमुख महादेव भोसले यांच्यामार्फत मिष्टान्न भोजन देत मायेचा घास भरवण्यात आला.

या कार्यक्रमासाठी युवती सेना कार्यकारी सदस्य प्रियंका परांडे, युवती सेना पंढरपूर तालुकाध्यक्ष वर्षा चव्हाण, प्रहारचे रणजीत जगताप, युवासेना पंढरपूर तालुका अध्यक्ष महादेव भोस-ले, युवा उद्योजक सोमनाथ लोखंडे, पांडुरंग रोकडे, संतोष परांडे, सुधीर गणगे, शुभम यादव, स्वप्निल कदम, अक्षय शितोळे, विश्वास वसेकर, मुख्याध्यापक मधुकर भोसले यांच्यासह विद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते.

यावेळी प्रियंका परांडे, महादेव भोस-ले यांनी आपल्या मनोगतातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सामाजिक विचारांच्या प्रेरणेतून ह्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आपली सामाजिक बांधिलकी जोपासत शिवसेना, युवा सेना, युवती सेना समाजातील सामान्य नागरिक व दुर्बल घटकांसाठी कार्यरत असून त्यास जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. असे सांगितले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना पदाधिकारी, महादेव भोसले मित्र मंडळाचे पदाधिकारी, विद्यालयाचे शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# ज्ञानज्योत फाउंडेशन आणि संत गाडगे महाराज विचारमंच आयोजित पुरस्कार वितरण आणि पुस्तक प्रकाशन सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे येथे ज्ञानज्योत फाउंडेशन महाराष्ट्र राज्य,पुणे आणि संत गाडगे महाराज विचार मंच महाराष्ट्र राज्य, ओतूर यांच्यावतीने पुरस्कार वितरण सोहळ्याचे व पुस्तक प्रकाशनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवी, व्याख्याते, दंगलकार नितीन(दादा) चंदशिवे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक जेष्ठ साहित्यिक प्रा. संजय घरडे व प्रमुख पाहुणे डॉ. प्रिती मोरे, मोहिनी कारंडे आणि प्रमुख उपस्थितीत म्हणून कथाकार हनुमंत क्षीरसागर, बाबासाहेब जाधव, दाद-ासाहेब सोनवणे हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या प्रास्ताविकेच्या वाचनाने करण्यात आली. यावेळी सेवानिवृत्त शिक्षिका सुभाताई लोंढे लिखित जिगरबाज व दीपस्तंभ ही दोन पुस्तके प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर विविध क्षेत्रांत मोलाची कामगिरी बजावणाऱ्या मान्यवरांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पुढील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले- किशोर इंगोले,प्रा.ना-गेश हुलवळे,सुजाता गोविंद नाणेकर, उमा लुकड, अक्षय भोईटे, रुपाली राऊत, सविता धामगये, प्रियंका बेंद्रे, रामचंद्र गायकवाड कविता बाविस्कर,श्रुती दळवी, साधनाताई शेळके, वत्सलाबाई पवार पाटील, आदी.

पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, पाच पुस्तके , सन्मानपत्र,रोख रक्कम असे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक जेष्ठ साहित्यिक संजय घरडे यांनी मनोगत मांडताना आंबेडकरी चळवळीतील इतिहासावर प्रकाश टाकला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, दंगलकार नितिन (दादा) चंदनशिवे यांनी मनोगत व्यक्त करताना, ऐतिहासिक घटनांचा दाखला देत उज्ज्वल भविष्यासाठी अथक परिश्रम घेतले पाहिजे असे सांगितले.

पुढे ज्ञानज्योत फाउंडेशन महाराष्ट्र राज्य च्या संस्थापक अध्यक्षा कविता काळे मॅडम यांनी पुरस्काराच्या बाजारीकरणावर प्रखर भाष्य केले. तसेच डॉ. प्रिती मोरे,मोहिनी कारंडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी ज्ञानज्योत फाउंडेशन च्या अध्यक्षा कविता काळे मॅडम, संत गाडगे महाराज विचारमंच चे अध्यक्ष रणजित पवार, ज्ञानज्योत च्या कार्याध्यक्ष कांचनताई मून ,कवयित्री रेखा फाले, रघुनाथ दादा कांबळे यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कांचन ताई म ून तर सूत्रसंचालन संजय गवांदे यांनी केले.

कार्यक्रमाचे आभार श्री. रणजित पवार यांनी मानले. व कार्यक्रमाची सांगता संत गाडगे महाराजांच्या पसायदानाने करण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पतंगोत्सव आपल्यासह इतरांसाठी कसा सुरक्षित होईल याची काळजी घ्या

## तहसीलदार नाईकवाडे यांचे नागरिकांना आवाहन; पतंग उत्सवाचा प्रचंड उत्साह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : पतंग उडविताना प्रतिस्पर्ध्याची पतंग कापण्याची जी मजा आहे ती काही वेगळीच असून म्हणूनच आपला पतंग आकाशात अधिक आकर्षक कसा दिसेल त्याचा मांजा काटाकाटी करतांना इतरांपेक्षा सरस कसा राहील यासाठी लागलेली चढा-ओढ बाजारातील पतंगांच्या दुकानात दिसून येत आहे, येणाऱ्या पतंग उत्सवासाठी आपल्याम ध्ये प्रचंड उत्साह दिसून येत असला तरी हा पतंगोत्सव आपल्यासह इतरांच्यासाठी ही कसा सुरक्षित होईल याची जबाबदारी घेणे ही आपल्या सर्वांची आहे असे आवाहन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

त्यांनी पुढे म्हटले आहे की पतंगाच्या मांज्यामुळे अनेक अपघातांना निमंत्रण मिळत असुन वाहन चालकांचा गळा कापणे ,खोलवर जाऊन जखम होणे, काहींना प्राणाला मुकावे लागले असून पतंग उडविण्याच्या मस्तीत दंग झाल्याने दुर्लक्ष होऊन उंच छतावरून पडून गंभीर जखमी होणे किंवा प्राणाला मुकावे लागते अशा घटना दरवर्षी घडत असतात इतकेच नाही तर पतंगाचा मांजा झाडात अडकून तो तसाच राहत असल्याने पक्षांचे पंख कापले जातात, पायाला गंभीर जखमा होतात म्हणून संक्रातीचा गोडवा कायम राखण्यासाठी खालील गोष्टींचे जरूर पालन करा

१)नायलॉन मांजाचा वापर करू नका, यामुळे स्वतःहासह इतरांना जखमांन पासून वाचविता येईल.

२) वाहन चालक जखमी होणार नाही याची दक्षता म्हणून रस्त्याच्या कडेला पतंग उडवू नका.

३) पक्षी जखमी होऊ नये याकरिता पक्ष्यांच्या झाडांजवळ पतंग उडविणे टाळा.

४) गच्चीवरून पतंग उडविणे टाळा मैदानातून पतंग उडवा यामुळे पडण्याचा आणि जखमी होण्याचा धोका नसतो.

५) वीजतारांच्या जवळ पतंग उडवू नका यामुळे शॉर्ट सर्किट होऊन विजेचा धक्का बसू शकतो.

६) सूर्यकिरणांच्या दिशेने पाहून पतंग उडवीत असाल तर गॉगलचा वापर जरूर करा यामुळे डोळ्यांना त्रास होणार नाही.

७) पतंग उडवून झाल्यानंतर तुमच्या जवळील पतंग किंवा मांजाचे पडलेले तुकडे उचलून घ्या आदी सूचना प्रसिद्धी पत्रकाद्वारे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केल्या असून प्रत्येकाने याची काळजी घ्यावी असे आव्हान त्यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### हँडल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : हँडल लॉक करून ठेवलेली फिर्यादी शाहिद अल्लाबक्ष छुरी (वय-२१,रा. महेश नगर हैदराबाद रोड यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३. डीजी.११५३ ही अज्ञात चोरट्याने चोरून




नेल्याची घटना २६ डिसेंबर रोजी रात्री आठ ते साडेआठ वाजण्याच्या सुमारास गांधीनगर येथे घडली. याप्रकरणी शाहिद छुरी यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

# दोस्ती ग्रुप च्या माध्यमातून राहुल बनला हजारो तरुणाचा दोस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महेश गायकवाड, सोलापूर

दोस्ती ग्रुप च्या माध्यमातून राहुल डगळे हजारो तरु-णाचा दोस्त बनला आहे त्यांनी आपल्या लहान वयात जवळपास पन्नास हजारांच्या वर मित्र जोडले आहेत.



दोस्ती ग्रुप हा महाराष्ट्र राज्यात आणि येवला येथे व इतर भागात प्रथम च चर्चेचा विषय ठरत आहे अवघा २२ वर्षीय तरुण पै.राहुल डघळे हा समाज कार्यासाठी अग्रेसर ठरत आहे. अत्यंत कमी वयात राहुल यांनी मित्रांचा मोठा आणि प्रचंड अफाट असा ताफा सोबत जोडला आहे. अत्यंत एवढ्या कमी वयात त्यानी ४० ते ५० हजार लोकांचा मित्रपरिवार जोडला असुन सर्वांशी एकनिष्ठ व प्रेमळ आणि निरपेक्ष भावनेने तो सर्वांना सोबत घेऊन कार्य करत असल्यामुळे राहुल सर्वत्र साधा सरळ माणूस म्हणजे च पै राहुल डघळे होय अशी ओळख निर्माण केला आहे. राहुल हा दोस्ती ग्रुप महाराष्ट्र संपर्कप्रमुख म्हणून ओळखला जातो आहे. कोणत्याही अडचणीस सामोरी जाणारा हा व्यक्ती म्हणजेच पै राहुल डघळे व व त्यांना आधार देणारे पैलवान प्रमोद राणा दोस्ती ग्रुप महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष यांच्या वतीने सर्व महाराष्ट्रामध्ये समाजसेवाचे काम कार्यरत असते व इतर जिल्ह्यात तालुक्यात पदे वाटप कार्यक्रम घेतला जातो व मित्रपरिवाराला समजून आपले कार्य कसे आहेत ते सांगितले जाते व दर महिन्यात आढावा बैठक घेतली जाते व कुठेही कोणत्याही कार्यकर्त्याला तकलीफ किंवा काही इतर समस्या असल्यास संपर्क करा असे सांगितले जाते व आपल्या परिवारा सारखे सांभाळ केला जातो इतर कोणती सेवा असो लोकांच्या हातून कोणते कार्य करून घ्यायचे ते नेहमी होणे खालील पदाधिकारी यांना सांगितले जाते व मनमाड शहर येथून प्रथम शाखा सुरू झालेली आहे त्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये खूप ठिकाणी शाखा ओपन झालेल्या आहेत ग्रुपचे वैशिष्ट्ये गोरगरीब जनतेला मदत केली जाते व इतर कोणत्याही पद्धतीचे परिवर्तन सहल करून घेतले जात नाही मागे एक प्रकरणा दरम्यान आपल्या कार्यकर्त्याला सुद्धा धडा शिकवला होता तो कोणीही असो चुकला त्याला माफी मागावी लागते व त्या सर्व मित्र परिवार पण तयार असतो तसेच लेटर पॅड मध्ये पण उल्लेख केलेला आहे त्याबद्दल आपल्या आधार कार्ड फोटो इत्यादी साहित्य ग्रुप फाईल यामध्ये आपली ओळख म्हणून ठेवल्या जाते ही संस्था चालू तीन वर्ष झाले असून यात तब्बल दोस्ती ग्रुप ची संख्या २० ते ३० हजार लोक इतकी महाराष्ट्र मध्ये बळकट सदस्य व पदाधिकारी संख्या आहेत नियमावली सर्वांना सारखीच असते कोणी मोठा कोणी छोटा व जातीभेद न करता संघटना चालते इत्यादी संघटनेचे वैशिष्ट्ये असतात महाराष्ट्राच्या बाहेरही लोकांचे प्रेम खूप आहे जसं की गुजरात तेलंगाना या राज्यांमध्ये पण काही दिवसात शाखा ओप-निंग होतील असे दोस्ती ग्रुपचे पदाधिकारी यांनी नियमावली २०२३ मध्ये आराखड्यात काढली होती इत्यादी व न कोणता राजकीय सपोर्ट ना कोणता पक्ष सपोर्ट फक्त आपला मित्र परिवार आपल्या घरासारखा जपणे हेच अस्तित्व आजपर्यंत दोस्ती ग्रुपचे आहे त्यामुळे दोस्ती ग्रुप ला कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा किंवा राजकीय पाठिंबा स्वीकारल्या जात नाही.

## प्रतिष्ठित व्यापारी नागराज माशाळे यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : प्रतिष्ठित व्यापारी तथा अक्कलकोट नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष नागराज शंकरराव माशाळे (वय ५९ ) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार रोजी निधन झाले. कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बसवराज माशाळे यांचे बंधू आ-हेत .त्याची अंत्ययात्रा शनिवार रोजी सकाळी १२ वाजता अक्कलकोट येथील राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, मुलगा, नातवंडे, सहा भाऊ व बहिणी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## ऊस तोडणी मजुराची कमतरता, शेतकरी संकटात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : ऊस गळीत हंगाम सुरू होऊन महिनाभर होत आला. ऊसतोड मजुरांची कमतरतेमुळे अनेकांचा ऊस तसाच शेतामध्ये थांबून आहे. एकीकडे महापुरामुळे उसाचे नुकसान त्यातच ऊस तोडणी मजुरांची कमतरता यामुळे शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. ऊसाला तुरा आल्यामुळे वेळेत ऊस जाणे हे फार महत्त्वाचे आहे. भविष्यात स्वतः शेतकऱ्यांनी ऊस तोडून कारखान्याला देणे असे घडेल का यात शंका नाही.

# माळी विकास मिशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने ग्रामविकास मंत्री मा. नामदार जयकुमार गोरे यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माण खटाव : सुधाकर रणदिवे, माण खटाव चे लोकप्रिय आमदार माननीय जयकुमार गोरे यांनी विजयाचा चौकार मारत राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. राज्याच्या ग्राम विकासासारखे महत्त्वाचे खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी श्री जयकुमार गोरे यांचेकडे दिले. या आनंदात सहभागी होत माळी विकास मिशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने सन्माननीय नामदार राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. जयकुमार गोरे यांचा सत्कार मंत्रालयासमोरील हॉटेल ट्रायडेंट मुंबई येथे शाल, बुके, अभिनंदन पत्र आणि महात्मा फुले समग्र वाङ्मय देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी माळी विकास मिशन महाराष्ट्र राज्याचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन चे समन्वयक अमृतराव काळोखे, शिक्षण प्रसार समिती समन्वयक संतोष भोजने, कृषी व उद्योजक आघाडी चे समन्वयक गोविंद सुमन केशव डाके, अर्थ सल्लागार समिती समन्वयक के आर चौधरी,किरणजी भुजबळ, पोपटराव राऊत, ज्ञानेश्वर महाजन, सचिन भरणे, ॲड.सतीश शिंदे यांच्या सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# शासकीय सुटीत श्री जागृत मारूतीच्या दर्शनासाठी हाऊसफुल्ल गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सुट्ट्या व वर्ष अखेरच्या निमित्ताने राज्य व परराज्यातील भाविक भक्तांनी श्री मारुतीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.यामुळे मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेले.अनेकांनी कुटुंबीयासोबत मारूतीचे दर्शनाने तुप्त व आनंद झाले.अक्कलकोट स्टेशन ते गौडगाव मारुती मंदिर पर्यंत पायी चालत जाणाऱ्यांची संख्या अधिक दिसून आली.जय जय बजरंग बली अशा घोषणा देत दक्षिणमुखीचे दर्शन घेतले.

गेल्या काही वर्षांपासून नागरिकांचा ओढा आता गौडगांव बु यथील श्री जागृत मारूतीच्या दर्शनासाठी वळू लागला आहे.त्यात अधिकची पसंती दिसून येत आहे.इथे येण्यासाठी दळण-वळण सोयीचे आणि सुलभ आहे.११ शनिवार,मंगळवार मारूतीचे दर्शन घेतल्याने मनातील इच्छा,अकांक्षा,मनोकामना पुर्ण होतो.अशी भक्तांची श्रद्धा आहे.शासकीय सुटीत मारूती मंदीरात हाऊसफुल्ल गर्दी होत असते.या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येकांना आनंद मिळतो,मनाला शांती,समाधान हे दर्शनाने मिळते म्हणून येथे येणाऱ्यांची संख्या अधिक आहे.



शासकीय सुट्यांमुळे सकाळी पहाटेपासूनच मारूतीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली होती.यावेळी महारूद्राभिषेक,नवग्रह पुजा, शनिपुजा,गजलक्ष्मी पुजा व होम हवन यज्ञ पार पडले.

त्यानंतर मारूतीस अभिषेक व आरती करण्यात आले. मारुतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आले हो-ते. प्रत्येक भाविक भक्तांना भक्तांना हनुमान चालीसा मंदिर समितीकडून देण्यात आले.तसेच दुपारची महाकाकड आरती प्रज्वल खताळ या भक्तांच्या हस्ते पाडली.राज्य व परराज्यातून आलेल्या हजारो भाविक भक्तांनी खीर हुग्गीचा महाप्रसाद म्हणून आस्वाद घेतला. माणिकराव पोतदार या भक्तानी महाप्रसाद दिला.

यावेळी श्रीकांत खानापुरे, सिद्राम वाघमोडे, प्रकाश मेंथे, ज्ञानेश्वर फुलारी, आमशिदद कोरे, चौडप्पा सोलापुरे, परमेश्वर सुतार, प्रकाश सनकळ, श्रीमंत सवळतोट, बिरप्पा पुजारी, श्रीमंत म्हेत्रे, मल्लिनाथ मेत्रे, मल्लिनाथ पाटील,भारत ननवरे श्रीमंत सवळतोट आदी उपस्थित होते.

**राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त तहसील कार्यालय व ग्राहक पंचायत यांचा संयुक्त उपक्रम**

# राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा; ग्राहक संरक्षण कायदा ग्राहकांचे कवच : तहसीलदार सचिन लंगोटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ग्राहक संरक्षण कायदा आहे ग्राहकांचे कवच असून ग्राहकांचे या कायद्याचा लाभ घ्यावा असे प्रतिपादन पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त तहसील कार्यालय व ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.




२६ डिसेंबर हा राज्यभर ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो ग्राहक दिनाचे औचित्य साधून सदर कार्यक्रम तह-सील कार्यालय पंढरपूर या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता पुढे बोलताना ते म्हणाले की ग्राहक संरक्षण कायदा हा नागरिकांसाठी ग्राहकांसाठी करण्यात आला आहे या कायद्यामुळे प्रत्येकाला आधार मिळाला असून यासाठी नागरिकांची सदर राहिली पाहिजे अशी ते म्हणाले आज समाजामध्ये ग्राहक पंचायती सारखी संघटना काम करते आहे त्यांच्या माध्यमातून अनेक कार्यक्रमाचे प्रश्न मार्गी लागले आहेत असे ते अध्यक्ष भाषणा-तून संवाद साधताना तह-सीलदार सचिन लंगोटे यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तहसीलदार लंगोटे तर प्रमुख पाहुणे म्हणून नंदकुमार देशपांडे हे होते प्रारंभी अखिल भारतीय ग्राहक पंचायत सर्वांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन तहसी-लदार लंगोटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

ग्राहक नागरिकांनी एखादी वस्तू खरेदी करताना पावतीचा आग्रह धरला पाहिजे कारण पावती शिवाय कुठलीही तक्रार चालत नाही ज्या ठिकाणी पैसे देऊन घेऊन व्यवहार केला जा-तो त्या सर्वांचा ग्राहक संरक्षण कायदा अनुसार पावती देणे बंधनकारक आहे आणि पावती घेणे ही नागरिकांचा हक्क आहे याकरिता नागरिकांनी जागरूक राहून पावतीचा आग्रह धरला पाहिजे असे अखिल भारतीय ग्राहक पंचायती तालुकाध्यक्ष नंदकुमार देशपांडे यांनी सांगितले.

प्रारंभी ग्राहक दिनानिमित्त प्रास्ताविक व सूत्रसंचालन आझाद अल्लापूरकर यांनी केले व कार्यक्रमात ग्राहक पंचायत सदस्य सतीश निपांकर सागर कारंडे विभूते विभागाची पदाधिकारी कुंभार तसेच सचिन तेथे सागर शिंदे सुरज सर्व दे तसेच तहसील कार्यालयातील विविध खात्याचे कर्मचारी नागरिक उपस्थित होते.

## संदीप पाटील यांची पोलीस हवालदारपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक २ पुणे येथे कार्यरत असलेले टाकळीवाडी गावचे सुपुत्र संदीप अजित पाटील यांची पोलीस हवालदार पदी निवड झाली. वर्गमित्र २००४ वर्गमित्र यांचे कडून त्यांचा सत्कार करण्यात आला.



## थोडक्यात...

### हात उसने घेतलेल्या पैशाच्या कारणावरून मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) तू माझ्याकडून हात उसने घेतलेले दहा हजार रुपये दे असे म्हणाल्यावर फिर्यादी त्यास पैसे नाहीत असे सांगत असताना शिवीगाळ करून फरशीचा




तुकडा हातात घेऊन फिर्यादीच्या कानावर मारून जखमी केल्याची घटना २६ डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास सदानंद मंगल भांडार येथे घडली.यप्रकरणी फिर्यादी रिजवान खलील मुच्छाले (वय-३८,रा.तेलंगी पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अरबाज मैंदर्गी,मुज्जु मैंदर्गी,गुलाब मैंदर्गी आणि एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार काळेल हे करीत आहेत.

### राहत्या घरासमोरून दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.यू.५५०५ हे अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २६ ते २७ डिसेंबर दरम्यान भवानी पेठ येथे घडली. याप्रकरणी सचिन शशिकांत रवी (वय-४६,रा.भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

# 'मविप्र'च्या विकासात योगदान देण्यास कटिबध्द : आ. दिलीप बनकर

## निफाड महाविद्यालयात आ.बनकर यांचा नागरी सत्कार, सभापती बाळासाहेब क्षीरसागर अभीष्टचिंतन सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : राजकारणापेक्षा समाजकार्य महत्वाचे मानून सरकारच्या माध्यमातून समाजाच्या शिक्षणसंस्था व कर्मचारी या सर्वांच्या समस्या सोडविण्यासाठी मी प्रयत्नशील असून, यापुढेही मविप्रच्या विकासात योगदान देण्यास कटिबध्द राहील, असा विश्वास निफाड मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार दिलीप बनकर यांनी व्यक्त केला. मविप्र समाजाच्या कर्मवीर गणपतदादा मोरे निफाड महाविद्यालयात आयोजित आमदार भव्य नागरी सत्कार समारंभ व सभापती बाळासाहेब क्षीरसागर अभीष्टचिंतन सोहळा कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी मविप्रचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, चिटणीस दिलीप दळवी, संचालक नंदकुमार बनकर, ॲड लक्ष्मण लांडगे, शिवाजी गडाख, संचालिका श्रीमती शालनताई सोनवणे, श्रीमती शोभा बोरस्ते, भागवत बाबा बोरस्ते, डॉ. उत्तमराव डेरले, शिक्षणधिकारी डॉ. डी.डी.लोखंडे, डॉ. एस.के. शिंदे, नगराध्यक्षा डॉ.कविता धारराव, उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, राजेंद्र डोखळे, पंढरीनाथ थोरे,भीमराज काळे,शिवाजीराव ढेपले माजी प्राचार्य ए.के.शिंदे, डॉ.डी.बी.शिंदे डॉ.किरण रकिबे, डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ.एस ए. खैरनार, महा. विकास आणि शालेय समितीचे सर्व सदस्य आणि सर्व मान्यवर उपस्थित होते. यावेळी आंतर महाविद्यालयीन कनोइंग आणि कयाकिंग या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आ. बनकर म्हणाले, कर्मवीरांच्या विचारांचा वारसा आणि वसा जतन करीत मविप्र समाज कार्य करीत आहे. यामध्ये सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांचे कार्य उल्लेखनीय आहे. शेती, सामाजिक, शैक्षणिक, सहकार आणि राजकीय क्षेत्रातील त्यांचे कार्य आदर्श असून, त्यांनी आपल्या कार्यातून आणि विचारांतून सामाजिक हित आणि बांधिलकी जोपसलेली आहे. त्यामुळे आदर्श व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे समाज बघत आहे, ही सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले.

सत्काराला उत्तर देताना सभापती बाळासाहेब क्षीरसागर म्हणाले, ''मला आजपर्यंत शेती, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करण्याची संधी मिळाली. सर्वच क्षेत्रात काम करीत असताना कर्मवीरांचे विचार आणि समाजहित समोर ठेवले होते. त्यामुळे माझे कार्य लोकप्रिय होत आहे. मविप्र समाजाच्या माध्यमातून समाजाची शैक्षणिक प्रगती करण्याची मिळालेली संधी ही सर्वश्रेष्ठ आहे. त्यामुळे सर्व कार्यकारी मंडळ आणि मविप्र सभासद यांचा ऋणी आहे. सर्वांना सोबत घेत काम करण्याचा वारसा वडीलांकडून मिळाला, त्यातूनच मी प्रत्येक कामाला न्याय देण्याचा प्रयत्न मी करतो, असे सांगत त्यांनी कार्यक्रमाबददल उपस्थितांचे आभार मानले.

### ५३२ नागरिकांची तपासणी, ८४ रक्तबाटल्यांचे संकलन

**मविप्रचे डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय तसेच राष्ट्रीय सेवा योजना व एनसिसी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सर्व रोग निदान आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण ५३२ नागरिकांनी तपासणी केली आणि ८४ दात्यांनी रक्तदान केले.**



अध्यक्षीय मनोगतात डॉ. सुनील ढिकले म्हणाले, ''निफाड मतदारसंघाचे नवर्विाचित आमदार यांचा सत्कार आणि सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वरोग निदान आणि रक्तदान शिबिर या समाजहिताय कार्यक्रमाचे आयोजन केल्यामुळे समाजातील नागरिकांचे आरोग्य जपण्याचे कार्य अभिमानास्पद आहे. या कार्यात सर्वांचे सहकार्य लाभत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मविप्रचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे म्हणाले समाजाच्या विकासासाठी आमदार दिलीप बनकर आणि सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी उत्तम काम करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. त्यांचा आदर्श नवयुवकांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांनी या कार्यक्रमाचा उद्देश व महत्व विशद केले, राजेंद्र डोखळे, नंदूभाऊ राजोळे, श्यामजी शिंदे, डॉ.सी.डी.शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

डॉ. महेश बनकर यांनी सूत्रसंचालन व संयोजन केले. प्रा.पी.एस गांगुर्डे यांनी परिचय करून दिला. डॉ. सुसान लॉरेन्सिया यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# हभप गुरवर्य रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या ५५ व्या पुण्यतिथी निमित्त शहरात भव्य मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
लोहा/(प्रतिनिधी) : दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हभप वेदांत केसरी परम पूज्य रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या ५५ व्या पुण्यतिथी निमित्त लोहा शहरात दि.(२७) रोजी आर्य वैश्य समाजबांधवांनी अतिशय जल्लोषात भव्य दिव्य अशी डोळ्याचे पारणे फिटेल अशा मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

तत्पूर्वी दि.२० डिसेंबर पासून दररोजच काकडा,श्रीस अभिषेक,ज्ञानेश्वरी पारायण, गीतापाठ, प्रवचन,हरिपाठ, हरि किर्तन आदी विविध धार्मिक




कार्यक्रम घेवून सप्ताहाची सांगता दि.२७ रोजी शुक्रवारी सकाळी ९ ते ११ या वेळेत सखाराम महाराज पालमकर यांचे अतिशय रसाळ वाणीत काल्याचे किर्तनाने झाली.


**शहरात भव्य मिरवणूक**

ह.भ.प.वेदांत केसरी परम पुज्य रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या प्रतिमेची सजलेल्या रथातून नगरेश्वर मंदिर पासून भव्य अशी मिरवणूक निघाली. पुरूषांनी पांढरे शर्ट व पांढरी पँट ,महिलांनी एक सारखी, एकाच रंगाची साडी परीधान करून मिरवणुकीत सहभागु झाले.महिलांनी डोक्यावर कलश घेऊन,चिमुकल्या बालकांना सजलेल्या घोड्यावर स्वार होऊन प्रचंड मोठी अशी भव्य शोभायात्रा काढली.तसेच टाळ मृदंगाच्या तालावर लयबद्ध पावली खेळत मुखे हरिनामाचा गजर करीत पुरूषांनी, महिलांनी, मुलींनी आकर्षक ढोलपथकाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.यावेळी मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले. शहरातील मुख्य रस्त्याने मार्केट कमिटीच्या कमानीमधून मोंढा यार्डातून पुन्हा मुख्य रस्त्याने बसस्थानक, शिवकल्याण नगर मार्गे नगरेश्वर मंदिरात सांगता झाली.तद्नंतर सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. विशेष म्हणजे समस्त आर्य वैश्य समाजबांधवांनी सर्वांनी आपापली प्रतिष्ठाणे बंद ठेवून सर्वांनी सहभाग नोंदविला.नगरेश्वर मंदिर समिती कमिटी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

सदरील भव्य शोभायात्रा मिरवणुकीत जागोजागी परम पूज्य रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून असंख्य भाविकांनी मनोभावे वंदन केले.

# पडघा येथील अद्वैत जाधवची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
भिवंडी/प्रतिनिधी
भारतातील वाय.एस.सी. एल. या यंग स्टार्स क्रिकेट लीग मध्ये (णछ-ऊएठ-१४) या वयोगटात महाराष्ट्र राज्यातून निवड होऊन दिल्ली, नोएडा येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत भिवंडी तालुक्यातील पडघा समतानगर येथिल कु. अद्वैत अमोल जाधव याने गोलंदाज म्हणून उत्कृष्ट गोलंदाजी करून महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करून त्याची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली आहे. तर ग्रामीण भागातील अद्वैत अमोल जाधव हा चेहरा दिल्ली, नोएडा येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत खेळताना




दिसणार आहे. तर विविध स्तरावर अद्वैत जाधव याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ग्रामीण भागातील आरोग्यसेवा समृद्धतेसाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना ग्रा.पं. सदस्या संज्योत धम्मरक्षित यांनी दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मुंबई /प्रतिनिधी
राज्यातील ग्रामीण भागात असणाऱ्या रिक्त पदांची भरती व्हावी तसेच जिल्हा उप रुग्णालयात सि.टी स्कॅन ही सेवा उपलब्ध करून ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक बळकट सक्षम आणि समृद्ध व्हावी यासाठी अंतिवडे येथील महिला ग्रामपंचायत सदस्य सौ. संज्योत धम्मरक्षित यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांना निवेदन देऊन ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी विनंती केली.

यावेळी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री आमदार प्रकाश आबिटकर यांनी ग्रामीण भागातीलआरोग्य समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. नामदार प्रकाश आबिटकर यांना मुंबई येथे निवेदन देण्यात आले.

अंतिवडे येथील महिला ग्रामपंचायत सदस्या सौ. संज्योत धम्मरक्षित यांनी या निवेदनात म्हटले आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्रात निवासी डॉक्टर रात्रीच्या वेळी कार्यरत नसल्याने अनेक रुग्णांची गैरसोय होते त्यामुळे निवासी डॉक्टर रात्रीच्या वेळी कार्यरत असावेत अशी मागणी केली.

तसेच ग्रामीण रुग्णालयात बालरोग तज्ञ,स्त्री रोग तज्ञ कायमस्वरूपी नेमणूक करून ग्रामीण भागातील पेशंटना मोफत रुग्णवाहिका सुरु करून चांगल्या प्रतीच्या औषधांचा पुरवठा व्हावा तसेच ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांना बळकटी मिळण्यासाठी आरोग्य निधीमध्ये वाढ करून सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि समृद्ध व्हावी अशी विनंती करून मागण्यांचे निवेदन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांना देण्यात आले.

यावेळी जेष्ठ नेते यशवंतराव हाप्पे, शिवसेना नेते राजू सावंत, संदीप वरंडेकर, दीपक वरंडेकर, बापूसाहेब चिल्ले, प्रकाश वरंडेकर, धनाजी भालेकर, राजेंद्र वरंडेकर, विजय राणे, प्रदीप वरंडेकर संदीप धम्मरक्षित आदी उपस्थित होते.



**३० डिसेंबर रोजी वेळ अमावस्या उत्साहात होणार साजरी**

**महाराष्ट्रातील लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यात होते साजरी**

# काय असते वेळ अमावस्या; कोण आणि का साजरी करतात?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
उमरगा/ज्ञानेश्वर गुरव
वेळ अमावस्या ही आनंददायी सण म्हणून साजरी केली जाते. महाराष्ट्रातील लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यात साजरी होणारी ही अमावस्या कशी साजरी होते जाणून घ्या...

धाराशिव जिल्हयात उद्या सोमवार दि. ३० डिसेंबर रोजी वेळ अमावस्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे. बळीराजाचा हा मुख्य सण असतो. वेळ अमावस्या दिवशी बळीराजाच



संपूर्ण कुटुंब शेतात असते. सोबतीला मित्र नातलग पै-पाहुणे वन भोजनाचा आनंद लुटायला असतात. या दिवशी



शहर व ग्रामीण भागातील गाव खेड्यात शुकशुकाट असतो निर्मनुष्य असते. कर्कश असणारा आवाज, लोकांची वर्दळ, असणारी शहरे, गावे शांत असतात.

उद्या मार्गशीर्ष अमावस्या ही म्हणजे वेळा अमावस्या. मुळात अमावस्या म्हणले की एक भिती असते, पण दिवाळी आणि आजची अमावस्या हे सण आनंददायी सण म्हणून साजऱ्या होणाऱ्या अमावस्या मानल्या जातात. आपल्या महाराष्ट्राला अनेकविध सणांची भलीमोठी परंपरा आहे. त्यातलाच हा एक सण. ही वेळा अमावस्या लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातल्या काही भागात साजरी होते. तसे पाहायला गेले तर हा आहे मूळचा कर्नाटकातला सण. तिथून तो महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात आला आहे. उर्वरीत महाराष्ट्रमध्ये बहुतेक हा सण साजरा केला जात नाही.

शेताच्या काळ्या आईच्या पूजेचा. ही आई आपल्याला धान्य देते, पालनपोषण करते, तिचे उपकार स्मरण्याचा आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. या दिवशी शिवार गर्दीने फुलून गेले असतात. प्रत्येक शेतात घरातील लोक,पैपाहुणे, मित्रमंडळी यांच्यामुळे सगळे शिवार माणसाने फुलून जातात.

या दिवशी शेतात कडब्याची म्हणजे धान्यांच्या वाळलेल्या धाटांची खोप बांधतात. पाच पांडवांची आणि इतर देवतांची पूजा करुन नैवेद्य दाखवतात. पूजेनंतर सगळेजण एकत्र बसून जेवणाचा आस्वाद घेतात. हा कार्यक्रम इतका महत्त्वाचा असतो की ज्यांचे स्वतःचे शेत नाही त्यांना दुसऱ्यांच्या शेतात आग्रहाने बोलावतात.

या दिवशी सगळ्याचा संध्याकाळपर्यंत शेतात मुक्काम असतो. उन्हं उतरली की लोक परतीच्या वाटेला लागतात. एक दिवस काळ्या आईच्या सान्निध्यात राहायच या सणाची पुढच्या वर्षी पर्यंत आतुरतेने वाट पाहिली जाते.